# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/८५५/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दि.:- १४/१२/२०१८

## अवैध दारूविक्री करणाऱ्या आरोपीस ३ वर्ष कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन लाखांदुर :– पोलीस स्टेशन लाखांदुर अंर्तगत मौजा कुडेगाव येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीला ३ वर्ष कारावास व २५०००/– रू. द्रव्यदंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा दिनांक १२/१२/२०१८ रोजी श्री.सुरजुसे सा. मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी कोर्ट लाखांदुर यांनी १) अप क्र. ६०७८/१६ कलम ६५ (ई) म. दा.का. मधील आरोपी नामे किशन तुळशिराम नाकतोडे वय ६७ वर्ष रा. कुडेगाव ता. लाखांदुर जि.भंडारा यास ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की, पोलीस नायक सतिश गिऱ्हीपुंजे नेमणुक पोलीस स्टेशन लाखांदुर यांनी दिनांक २९/०८/२०१६ ला यातिल आरोपीचे ताब्यातुन बिना पास परवाना १५३० एमएल देशि दारू अवैध रित्या मिळुन आल्याने अप क्र. ६०७८/१६ कलम ६५ (ई) म.दा.का गुन्हा नोंद केला.

महाराष्ट्र दारुबंदी कायदया अंतर्गत सदर गुन्हयाचा तपास पोलीस नायक सतिश गिऱ्हीपुंजे पोलीस स्टेशन लाखांदुर यांनी गुन्हयात आरोपी नामे किशन तुळशिराम नाकतोडे वय ६७ वर्ष रा. कुडेगाव ता. लाखांदुर जि.भंडारा यास कायदेशिर अटक करून गुन्हयाचा तपास केला तपासात आरोपी विरूध्द् योग्य व सबळ पुरावे प्राप्त झाल्याने गुन्हयात आरोपीतांन विरूध्द् आरोपपत्र तयार करून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट लाखांदुर येथे दाखल केले सदर आरोपपत्रास केस. क्र. १५/१७ अन्वये खटला सुनावणी करीता ठेवण्यात आला.

सदर गुन्हयाची सुणावणी श्री. सुरजुसे सा. मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी लाखांदुर यांचे समक्ष चालली साक्षदार तपासुन योग्य बाजु मांडली. योग्य बाजु मांडुन गुन्हयातिल साक्षदार तपासले दिनांक १२/१२/२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभीरता लक्षात घेवुन गुन्हयातिल

आरोपी नामे किशन तुळशिराम नाकतोडे वय ६७ वर्ष रा. कुडेगाव ता. लाखांदुर जि.भंडारा याचे विरूध्द् आरोप सिध्द् झाल्याने कलम ६५ (ई) म.दा.का. मध्ये ३ वर्ष साधा कारावास व २५०००/– रू. द्रव्यदंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम ठाणेदार पो.स्टे. लाखांदुर यांचे मार्गदर्शनात पोलीस नायक नितीन कुमार साठवणे यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.


(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता